# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 139/2023 दिनांक : 06.04.2023

### 1)मो. सा. चोरी :–

**देगलूर :–** दिनांक 02.04.2023 रोजी 21.30 वा. ते दिनांक 03.04.2023 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **साधनानगर देगलूर क्षिरसागर सर यांचे घरासमोर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा गॅल्मर कंपनीची मो.सा. क्रं. ए.पी./25–एएच–9685 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी तानाजी तेजराव मिसाळे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. शेटलुर मंडळ बिचकुंदा जि. कामारेड्डी ह.मु. साधना नगर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे देगलूर** गुरन 172/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/580 तलवारे, मो. क्रं. 9657707295** हे करीत आहेत.

### 2)मो. सा. चोरीचा प्रयत्न :–

**नायगाव :–** दिनांक 05.04.2023 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे ज्युस सेंटर समोर मेन रोड नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपनीची मो.सा. क्रं. एम.एच./26–बीझेड–8468 हि नमुद ठिकाणा वरून यातील नमुद आरोपीने चोरून नेण्याचा प्रयत्न करत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी महमद सलीम महमद इब्राहिम बागवान, वय 39 वर्षे, व्यवसाय ज्युस सेंटर रा. शामनगर नरसी नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे नायगाव** गुरन 39/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मुस्तापुरे, मो. क्रं. 9325850996** हे करीत आहेत.

### 3)जनावर चोरी :–

**रामतीर्थ :–** दिनांक 04.04.2023 रोजी 18.00 ते दिनांक 05.04.2023 रोजी 06.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे शेत गट क्रं. 47 मधुन नरसी शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे व त्यांचे नातलगातील एकुण चार म्हैसी, चार वासरे, एक वगार असे एकुण किंमती 5,15,000/–रूपयाचे जनावरे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. **फिर्यादी विठ्ठल शंकरराव बोडके, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. नरसी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 54/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2079 तमलुरे, मो. क्रं. 7038032440** हे करीत आहेत.

### 4)शासकीय कामात अडथळा :–

**भाग्यनगर :–** दिनांक 05.04.2023 रोजी 17.30 वा. सुमारास, **जंगमवाडी पावर हाऊस सिदधार्थ नरवाडे यांचे घरासमोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची टिम जंगमवाडी पॉवर हाऊस ते शेतकरी चौक पर्यंत रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम करीत असतांना सिदधार्थ नरवाडे यांच्या मालमत्ता पाडापाडीचे काम व समोरील नाली बांधकामाचे खोदकाम करीत असताना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून माझे घर जे.सी.बी. ने का तोडले या कारणा वरून वाद घालुन शिवीगाळ करून जे.सी.बी. चालकास हाताने मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी श्रीगणेश रामा शिंदे, वय 59 वर्षे धंदा नौकरी रा. लुंबिनीनगर विणकर कॉलनी चौफाळा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 134/2023 कलम 353,323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नंनवरे, मो.क्र. 8888691776** हे करीत आहेत.

### 5)अपघात :–

**बारड :–** दिनांक 05.04.2023 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **बारड गावाजळील लेंडी पुलाचे जवळ नांदेड ते भोकर जाणारे रोडवर मौजे बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गजानन अदिनाथ रामभाऊ बिजमवार, वय 30 वर्षे, व्यवसाय मेडीकल दुकान रा. गांधीचौक भोकर ता. भोकर जि. नांदेड** हा त्याची होंडा शाईन मोटार सायकल क्रं. एम.एच./26–बी.डब्ल्यु.–8203 वर बसुन नांदेड कडुन भोकर कडे जात असताना त्याचे समोरून भोकर कडुन येणारा ट्रक क्रमांक एमएच–18/एए–5664 चा चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक ही हयगय व निष्काळजीपणाणे भरधाव वेगात चालवुन यातील मयत यास समोरून जोराची धडक देवून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी अदिनाथ रामभाऊ बिजमवार, वय 57 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. गाधीचौक भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं. 22/2023 कलम 279,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुगावे, मो.क्रं. 9822179877** हे करीत आहेत.

### 6)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 02.04.2023 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **अर्सजन नाका पेट्रोल पंपाच्या समोर रोडवर असर्जन चौक, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक खंजर बाळगेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1991 विक्रम बालाजीराव वाकडे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 235/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भारती, मो.क्रं. 9096270187** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड